आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१३ सप्टेंबर २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- विकासाच्या मार्गावर चालण्यासाठी शांतता आवश्यक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मणिपूरमध्ये प्रतिपादन, मिझोरममधल्या पहिल्या रेल्वेमार्गाचंही उद्घाटन

- नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीची सदस्या सुजाता हिचं तेलंगणा पोलिसांसमोर आत्मसमर्पण

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत उद्या भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना

आणि

- आशिया चषक महिला हॉकी स्पर्धेच्या अंतिम फेरीत उद्या भारत आणि चीन यांच्यात सामना

**<><><><>**

विकासाच्या मार्गावर चालण्यासाठी शांतता आवश्यक आहे. आपली स्वप्नं साकारण्यासाठी आणि मुलांच्या सुरक्षित भविष्यासाठी शांततेच्या मार्गावर चालावं असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मणिपूरमधल्या सर्व गटांना केलं. ते मणिपूरमध्ये एका सभेत बोलत होते. मणिपूर ही आशा आणि विकासाची भूमी आहे, मात्र इथल्या वांशिक हिंसाचाराच्या परिस्थितीत शांततेशिवाय विकास होऊ शकत नाही. म्हणूनच मणिपूरच्या विकासाकरता जातीय द्वेष, तणाव आणि संघर्ष संपुष्टात आणण्याची गरज असल्याचं ते म्हणाले. केंद्र सरकार कायमच मणिपूरच्या जनतेच्या पाठीशी असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

**- - होल्ड बाईट - मोदी- -**

त्याआधी त्यांनी चुराचंदपूर इथं सात हजार तीनशे कोटी रुपयांच्या, रस्ते - राष्ट्रीय महामार्ग, जल-मल निःसारण, मालमत्ता व्यवस्थापन सुधारणा, माहिती तंत्रज्ञानविषयक प्रकल्प, काम करणाऱ्या महिलांसाठीची वसतिगृह या आणि अशा क्षेत्रांशी संबंधित १९ विकासकामांचं भूमिपूजनही केलं. या प्रकल्पांमुळे पायाभूत सुविधा आणि आरोग्यसेवांच्या बाबतीत मणिपूरमधल्या जनतेचं जीवनमान सुधारेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. केंद्र

सरकार या प्रदेशातल्या दळणवळणीय जोडणीतल्या सुधारणा आणि विस्तारासाठी करत असलेल्या प्रयत्नांची माहितीही त्यांनी उपस्थितांना दिली.

आपल्या मणिपूर भेटीत प्रधानमंत्र्यांनी काही विस्थापितांचीही भेट घेतली. या विस्थापितांमध्ये आपल्याला आशा आणि विश्वास दिसून आल्याचं त्यांनी सांगितलं.

सकाळी त्यांनी मिझोरमच्या विकासात योगदान देणाऱ्या, नऊ हजार कोटींहून अधिक खर्चाच्या महत्त्वाकांक्षी योजनांचा दूरस्थ पद्धतीनं प्रारंभ केला. यात मिझोरममधल्या बैरागी-सायरंग या पहिल्या रेल्वेमार्गाचा समावेश आहे. सायरंग-दिल्ली राजधानी एक्सप्रेस, सायरंग-गुवाहाटी एक्स्प्रेस आणि सायरंग-कोलकाता एक्स्प्रेस या तीन नव्या एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांनाही प्रधानमंत्री मोदी यांनी आज हिरवा झेंडा दाखवला.

संध्याकाळी गुवाहाटी इथं ज्येष्ठ आसामी गायक, भारतरत्न डॉ. भूपेन हजारिका यांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमातही प्रधानमंत्री सहभागी झाले. या कार्यक्रमात त्यांनी हजारिका यांच्या आसामी भाषेतल्या चरित्राचं तसंच त्यांच्या स्मरणार्थ तयार केलेलं नाणं आणि पोस्टाच्या तिकिटाचं अनावरण केलं.

<><><><>

देशातल्या सर्व विधान मंडळांमध्ये सार्वजनिक महत्त्वाच्या मुद्द्यांवर अर्थपूर्ण चर्चा आणि वादविवाद व्हावे तसंच सामाजिक आणि राष्ट्रीय हितासाठी माहितीपूर्ण निर्णय घेतले जावे, अशी अपेक्षा लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी व्यक्त केली. ते आज बंगळुरू इथं राष्ट्रकुल संसदीय संघाच्या ११व्या भारत विभाग परिषदेच्या समारोप सत्रात बोलत होते. सदनाची कार्यवाही आणि घेतले जाणारे निर्णय याबाबतची माहिती लोकांपर्यंत पोहचली पाहिजे, असं ते म्हणाले. संसद सदस्यांनी आपल्या राजनैतिक बांधिलकीच्या पुढे जाऊन सामाजिक हितासाठी धोरणात्मक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घाव्या, असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><>

अमृत सरोवर अभियानांतर्गत देशात ६८ हजार तलावांची निर्मिती झाली असल्याची माहिती सरकारनं प्रसिद्ध केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्येक जिल्ह्यात ७५ अमृत सरोवरांची निर्मिती करण्याचं किंवा त्यांचं पुनरुज्जीवन करण्याचं उद्दिष्ट ठेवून एप्रिल २०२२ मध्ये हे अभियान सुरू केलं होतं.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं नुकतंच अनेक क्षेत्रातल्या वस्तू आणि सेवा करात कपात करुन सर्वसामान्यांना दिलासा दिला. जीएसटी कपात झाल्यामुळे अनेक व्यवसायाच्या वाढीसाठीही मदत होणार आहे.

जीएसटी कपातीमुळे पर्यटन क्षेत्रावर होणाऱ्या परिणामाबाबत जाणून घेऊया…

**- - - होल्ड - व्हाईट कास्ट - -**

*(नव्या सुधारणेनुसार हॉटेलमधल्या निवासावरच्या जीएसटीमधे कपात झाली आहे. यामुळे पर्यटकांना परवडणाऱ्या दरात हॉटेल उपलब्ध होतील, आणि पर्यटनाला चालना मिळेल. तसंच हॉटेल, होम स्टे आणि अतिथीगृहामधल्या गुंतवणूकीतही वाढ होईल.*
*त्याचप्रमाणे बस आणि मिनीबसच्या जीएसटी दरातही कपात झाल्यामुळे तिकीट दर कमी होतील. यामुळे पर्यटकांना प्रवास करण्यासाठी तसंच टूर एँड ट्रॅव्हल्स कंपन्यांना प्रोत्साहन मिळून पर्यटन क्षेत्राला लाभ होईल.)*

**<><><><>**

कर्नाटकच्या हसन जिल्ह्यात काल संध्याकाळी गणेश मूर्ती विसर्जनासाठी आलेल्या गर्दीत एक मालवाहू ट्रक घुसून झालेल्या अपघातात नऊ जणांचा मृत्यू झाला. तर १८ हून अधिक जण जखमी झाले आहेत. समोरुन येणाऱ्या दुचाकीला टाळताना हा अपघात झाला. या अपघातात चालकही जखमी झाला असून त्याला ताब्यात घेण्यात आलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केलं असून प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनीही दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><>**

४३ वर्षांपासून भूमिगत असलेली नक्षलवादी सुजाता ऊर्फ पोतुला पद्मावती उर्फ कल्पना हिनं तेलंगणा पोलिसांसमोर शरणागती पत्करली. आरोग्याच्या कारणांमुळे सुजाताने शरणागती पत्करल्याचं पोलीस महासंचालक जितेंद्र यांनी सांगितलं. सुजाता ही बंदी असलेल्या भाकप माओवादी या पक्षाची केंद्रीय समितीची सदस्य होती. नक्षलवादी चळवळीतला महत्त्वाचा नेता किशनजी याची ती पत्नी आहे.

<><><>

युक्रेनने बाल्टिक समुद्रातील रशियाच्या सर्वात मोठ्या तेल टर्मिनलवर ड्रोन हल्ला केला. लेनिनग्राड प्रांतातील प्रिमोर्स्क बंदर, बाल्टिक पाईपलाईन सिस्टम आणि रशियाचं सागरी निर्यात केंद्र इथं हे हल्ले करण्यात आले. तर युक्रेनने सोडलेले २२१ ड्रोन रोखण्यात रशियाला यश आल्याचं रशियाच्या संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><>

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत उद्या भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना होणार आहे. दुबई इथं होणारा हा रात्री आठ वाजता सुरु होणार आहे. दोन्ही संघांनी स्पर्धेतला आपापला यापूर्वीचा सामना जिंकला आहे.

या स्पर्धेत आज ब गटात, अबुधाबी इथं श्रीलंका आणि बांग्लादेश यांच्यात सामना होत आहे. नाणेफेक जिंकून श्रीलंकेनं क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

<><><>

आशिया चषक महिला हॉकी स्पर्धेच्या अंतिम फेरीत उद्या भारताचा सामना चीनबरोबर होईल. आज जपानबरोबरचा भारताच सामना बरोबरीत सुटला. चीनमधे हांगझू इथं झालेल्या सुपर फोर गटातल्या या अखेरच्या सामन्यात दोन्ही संघांनी प्रत्येकी एक-एक गोल केला. भारताच्या ब्यूटी डंगडंग ने सुरुवातीलाच गोल केला, तर अखेरच्या क्वार्टरमधे जपानच्या शिहो कोबायाकावा ने  त्याला प्रत्युत्तर दिलं.

<><><>

हाँगकाँग खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी जोडीनं अंतिम फेरी गाठली आहे.  आज सकाळी उपान्त्य फेरीत या जोडीनं चीन ताइपेच्या जोडीचा २१-१७, २१-१५ असा सरळ सेटमध्ये पराभव केला.

अंतिम लढतीत सात्विक आणि चिराग यांचा सामना लिआँग वेई केंग आणि वांग चेंग जोडीशी होणार आहे.

या स्पर्धेत लक्ष्य सेननं पुरुष एकेरीच्या अंतिम स्पर्धेत मजल मारली. त्याने उपान्त्य फेरीत तैवानच्या छोऊ तिएन चेन याचा २३-२१, २२-२० असा पराभव केला.

<><><>

बिजींगमधे सुरू असलेल्या आंतऱराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा महासंघ विश्वचषक स्पर्धत भारताच्या ईशा सिंगने १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक पटकावलं आहे. ईशाने चीनच्या याओ चियानसुन हिचा ०-१ गुणांनी पराभव केला. ईशाच्या सुवर्णपदकानंतर भारत पदकतालिकेत पाचव्या क्रमांकावर पोहोचला आहे.

दरम्यान, पुरुषांच्या २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूलमधे भावेश शेखावतने २२ वं स्थान पटकावलं आहे, तर प्रदीप सिंग शेखावतने २३ वं स्थान पटकावलं आहे.

**<><><><>**

इंग्लंडमध्ये लिव्हरपुल इथं सुरु असलेल्या जागतिक मुष्टीयुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या तीन महिला मुष्टीयोद्ध्यांनी आपापल्या गटात अंतिम फेरी गाठली आहे.

आज झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात ४८ किलो वजनी गटात भारताच्या मिनाक्षी हीनं मंगोलीयाच्या खेळाडुला ५ - ० असं नमवलं, तर जास्मीन हीनं ५७ किलो वजनी गटात ओमेलियाच्या कॅरोलविना हीला ५ - ० असं पराभूत केलं. ८० किलो वजनी गटातही नूपूर हीनं तुर्कीएच्या सेमा हीच्यावर विजय मिळवला.

महिलांच्या ८० किलो वजनी गटात भारताची पुजा राणी हिनं देखील उपांत्य फेरी गाठली असून, तिची लढत इंग्लंडच्या एमिली हिच्यासोबत होणार आहे.

पुरुषांच्या ५० किलो वजनी गटात मात्र उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या जादूमणी याचा पराभव झाला.

**//<><><><>//**